जा.क्र/जिपना/आस्था-२अ/ ३४९४/२०२५
समान्य प्रशासन विभाग , जिल्हा परिषद नांदेड
दिनांक :: २४.०९.२०२५

प्रति ,

प्रतिक्षासुचितील सर्व अनुकंपा धारक,

विषय :: प्रतिक्षासुची वरील अनुकंपा धारकानी दिनांक २५.०९.२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता आयोजित मेळाव्यास उपस्थित रहाणे बाबत.(स्थळ- कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प.नांदेड)

संदर्भ ::१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. दि. १७.०७.२०२५
२ ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दि. ३१.०७.२०२५
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ. दि. १७.०७.२०२५
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचेकडील प्राप्त सूचना दि. ०२.०९.२०२५.
५. या कार्यालयाचे पत्र क्र ३३११ / २०२५ दिनांक १२.०९.२०२५

उपरोक्त विषयान्वये सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आले आहे. ग्रामविकास विभागाकडील संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयामध्ये आवश्यक ते बदल करुन सामान्य प्रशासन विभागाकडील उक्त शासन निर्णयातील ऊर्वरित सर्व तरतुदी जशा आहेत तशा सर्व जिल्हा परिषद गट-क व गट-ड कर्मचा-यांना लागू करण्यात आल्या आहेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद नांदेड च्या अनुकंपा तत्वावर नेमणूकीसाठीच्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांचा मेळाव्याचे अयोजन करण्याच्या सूचना आहेत.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, जिल्हा परिषद नांदेड च्या अनुकंपा तत्वावर नेमणूकीसाठीची गट क व गट ड पदासाठी सहमती दिलेल्या उमेवारांची प्रतिक्षासूची नांदेड जिल्हा परिषदेच्या https://zpnanded.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे

तेव्हा आपण दिनांक २५.०९.२०२५ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. **कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प.नांदेड येथे** आपल्या मुळ व झेरॉक्स प्रत(स्वतः सांक्षाकीत करून ) शैक्षणिक कागदपत्रासह उपस्थित राहावे .

प्रतिलिपीः ०१. गटविकास अधिकारी, पं.स. सर्व जि. नांदेड यांना प्रतिक्षा सुची सह देवुन कळविण्यात येते की , सदर प्रतिक्षासुची आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी व प्रतिक्षासुची वरील अनुकंपाधारकाना उपस्थित राहण्यास्तव आपल्या स्तरावरून अवगत करावे.
०२. संपादक,दैनिक----------------------------------------- नांदेड यांना देवून सुचित करण्यात येते की, सोबतची प्रेसनोट आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात विना मुल्य बातमी रुपाने प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती

Signed by
Rajkumar Vilasrao Mukkawar
Date: 24-09-2025 14:31:51

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद नांदेड





Scanned with OKEN Scanner